INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 12 | JANUARY – 2026

# यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

**श्री. दयानंद एन. पुडके**
**संशोधनकर्ता**

**डॉ. मारोती बी. राठोड**
**मार्गदर्शक ,**
**शिवरामजी मोघे कला , वाणिज्य व विज्ञान महाविधालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ**

**सारांश**

यवतमाळ जिल्ह्यात शेती हा मुख्य उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. मात्र, या जिल्ह्यातील शेतीविकासाकडे शासनाचे अपेक्षित लक्ष राहिलेले दिसून येत नाही. अपुऱ्या सिंचन सुविधांमुळे येथील बहुतांश शेती कोरडवाहू स्वरूपाची आहे. परिणामी, अनिश्चित व हवामानावर अवलंबून असलेल्या पीक उत्पादनावरच शेतकऱ्यांची उपजीविका अवलंबून राहिली आहे. तसेच शेतमालाला योग्य व हमीभाव मिळावा यासाठी आवश्यक असलेल्या बाजारपेठा, साठवणूक व वाहतूक सुविधा जिल्ह्यात अपुऱ्या असल्याने शेतकऱ्यांच्या समस्या अधिक तीव्र झाल्या असून, ही परिस्थिती शेतकरी आत्महत्यांस कारणीभूत ठरत आहे.



शेतीपूरक उद्योगांना चालना देण्याच्या उद्देशाने तत्कालीन उद्योगमंत्री जवाहरलाल दर्डा यांच्या कार्यकाळात यवतमाळ जिल्ह्यातील लोहारा परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. तथापि, या औद्योगिक क्षेत्रात अपेक्षित प्रमाणात शेतीपूरक उद्योगांची उभारणी होऊ शकलेली नाही. प्रत्यक्षात, या परिसरात एकशे बत्तीस किलोव्होल्ट क्षमतेचे विद्युत उपकेंद्र, तसेच पुरेशा पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध असूनही शेतीपूरक उद्योगांचा विकास अद्याप झालेला नाही.

**प्रस्तावना**

भारतामध्ये शेती ही केवळ आर्थिक क्रियाकलाप न राहता, कोट्यवधी लोकांचे जीवनधारणाचे प्रमुख साधन आहे. महाराष्ट्रातील विदर्भ भागात असलेल्या यवतमाळ जिल्ह्यात पारंपरिकपणे शेती हा उपजीविकेचा मुख्य आधार राहिला आहे. येथे मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या कापूस, सोयाबीन, तूर व इतर खरीप पिकांच्या लागवडीवर अवलंबून आहे. तथापि, मागील काही दशकांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेती संकट ही भारतीय कृषी क्षेत्रासमोरील व्यापक व संरचनात्मक अडचणींचे प्रतिक बनले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात वारंवार दुष्काळ, अनियमित व अवकाळी पावसाळी स्थिती, कधीमधी पूर अशा हवामानातील अस्थिरतेमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यासोबतच, शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांचा वाढता खर्च, उत्पादनांचे घसरते दर, अपुरी सिंचन सुविधा, बाजारपेठेपर्यंत असलेली मर्यादित पोहोच, आणि संस्थात्मक पाठिंब्याचा अभाव यांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक असुरक्षितता अधिकच वाढली आहे. परिणामी, विशेषतः लहान व सीमांत शेतकऱ्यांना शेतीच्या माध्यमातून पुरेसे व शाश्वत उत्पन्न मिळवणे कठीण झाले आहे. या

सामाजिक-आर्थिक संकटामुळे कर्जबाजारीपणा, दारिद्र्य आणि दुर्दैवाने शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून, ही बाब राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरही चिंतेचा विषय बनली आहे.

या कठीण परिस्थितीत, अनेक शेतकऱ्यांनी उत्पन्नाच्या पर्यायी स्रोतांचा शोध घेत पूरक व संलग्न कृषी व्यवसायांकडे वळण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये विशेषतः कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय आणि अंतर्गत मत्स्यपालन या क्षेत्रांनी आशादायक पर्याय म्हणून उभारी घेतली आहे. ही क्षेत्रे तुलनात्मकदृष्ट्या कमी भांडवली गुंतवणुकीत, कमी जागेत व लवकर परतावा देणारी असल्यामुळे लोकप्रिय ठरत आहेत. तसेच, ही व्यवसाय पद्धती यवतमाळच्या कृषी-हवामानाच्या परिस्थितीस आणि विद्यमान ग्रामीण श्रमबळाच्या रचनेशी अनुकूल आहे.

कुक्कुटपालन हे लहान उत्पादन चक्र आणि अंडी-मांस यांची वाढती मागणी लक्षात घेता ग्रामीण कुटुंबांमध्ये वेगाने स्वीकारले जात आहे. शेळ्या या कठोर सहनशील प्राणी असून, कमी देखभाल लागते आणि त्या अल्पसाधन असलेल्या परिस्थितीतही भरभराटीला येतात. त्यामुळे शेळीपालन हा लहान शेतकऱ्यांसाठी उपयुक्त व्यवसाय ठरतो. दुग्धव्यवसाय हा दैनंदिन उत्पन्नाचा स्रोत ठरतो आणि दूध विक्रीमुळे शेतकऱ्यांना नियमित रोख उत्पन्न मिळते. अन्न व पोषण सुरक्षेसाठीही तो उपयुक्त आहे. 'जलयुक्त शिवार' योजनेअंतर्गत झालेल्या जलसाठ्यांच्या उभारणीमुळे काही भागांत मत्स्यपालनालाही चालना मिळालेली आहे.

२०१२ ते २०२२ हा काळ यवतमाळ जिल्ह्यात पूरक कृषी व्यवसायांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कालावधीत राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY), राष्ट्रीय पशुधन अभियान, एकात्मिक दुग्धविकास कार्यक्रम व नील क्रांती यांसारख्या विविध शासकीय उपक्रमांद्वारे या क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यात आले. यासोबतच, स्वयंसेवी संस्था, स्वयंमदत गट (SHG), सहकारी संस्था व खासगी क्षेत्रातील सहभागाद्वारे प्रशिक्षण, निविष्ठा उपलब्धता, पशुवैद्यकीय सेवा आणि बाजारात जोडणी या सर्व पातळ्यांवर सक्रिय प्रयत्न झाले. त्यामुळे हे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वततेचा अविभाज्य भाग म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.

तरीसुद्धा, या व्यवसायांमध्ये वाढ दिसून येत असली, तरी अनेक अडथळे अद्यापही आहेत. शेतकऱ्यांमध्ये तांत्रिक ज्ञानाचा अभाव, पुरेशी पशुवैद्यकीय व पायाभूत सुविधा नसणे, पशुधनाच्या बाजारमोलातील चढ-उतार, शीतसाठा वा वाहतूक सुविधा यांचा अभाव, आणि कमी व्याजदराच्या कर्जसुविधांचा अपुरा लाभ या अडचणी प्रमुख आहेत. याशिवाय, साक्षरता, लिंग, जमिनीच्या मालकीचा आकार व जातीय व्यवस्थेतील गतिशीलता यासारखे सामाजिक-सांस्कृतिक घटक देखील शेतकऱ्यांच्या सहभागावर प्रभाव टाकतात.

त्यामुळे, या दहा वर्षांच्या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यातील पूरक कृषी व्यवसायांचे कार्य, लाभदायकता व अडथळ्यांचे सखोल व पद्धतशीर आर्थिक विश्लेषण करणे आवश्यक ठरते. वाढीचे पॅटर्न, गुंतवणुकीवरील परतावा व संस्थात्मक पाठिंब्याची भूमिका समजून घेतल्यास, ग्रामीण उपजीविकेवर या व्यवसायांचा झालेला परिणाम स्पष्ट होईल. अशा प्रकारचा अभ्यास केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर धोरणात्मक योजना, विकास कार्यक्रमांची रचना व शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन पाठबळ उभे करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आहे.

कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्यपालन या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करत, या अध्ययनातून यवतमाळ जिल्ह्यामधील ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक आराखड्यावर या उपक्रमांचा काय परिणाम झाला आहे याचे विश्लेषण केले जाईल. या व्यवसायांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक घटक व अडथळ्यांची ओळख पटवणे हेही या अध्ययनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या संदर्भातून, हा अध्ययन भारतातील कृषी विविधीकरण, उत्पन्न स्थिरीकरण व ग्रामीण परिवर्तनाच्या व्यापक चर्चेला एक महत्त्वपूर्ण अभ्यासात्मक योगदान देईल.

**सारणी क्रमांक १: यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्नानुसार (रू.) वर्गीकरण**

| वार्षिक शेती उत्पन्न (रू.) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू.५०,००० पेक्षा कमी | ५९ | ८.६ |
| रू. ५०,००१ - रू. १,००,००० | १३४ | १९.६ |
| रू. १,००,००१ - रू. २,००,००० | १७८ | २६.१ |
| रू. २,००,००१ - रू. ३,००,००० | १५४ | २२.५ |
| रू. ३,००,००१ - रू. ५,००,००० | ११६ | १७.० |
| रू. ५,००,००० पेक्षा जास्त | ४२ | ६.१ |
| **एकूण** | **६८३** | **१००.०** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| १२५.७ | ५ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्नानुसार (रू.) वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील २६.१% शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्न रु. १,००,००१ - रु. २,००,००० दरम्यान असून २२.५% शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्न रु, २,००,००१ - ३,००,००० दरम्यान आहे. तसेच १९.६% शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्फ्न रू. ५०,००१ - रू. १,००,००० दरम्यान व १७.०% शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्न रू. ३,००,००१ - रू. ५,००,००० दरम्यान असून वार्षिक शेती उत्पन्न रु. ५०,००० पेक्षा कमी व रु. ५,००,००० पेक्षा जास्त आहे हे नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ८.६% व ६.१% आहे.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतकऱ्यांची वार्षिक शेती उत्पन्नानुसार (रू.) तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = १२५.७; स्वातंत्र्यांश =५; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्न रु.१,००,००१ - रु. २,००,००० दरम्यान आहे.

**सारणी क्रमांक २ : यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्नानुसार (रू.) वर्गीकरण**

| वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न (रू.) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| कृषी उत्पन्न नाही | १२५ | १८.३ |
| रू. २५,००० पेक्षा कमी | ९९ | १४.५ |
| रू. २५,००१ - रू. ५०,००० | १४१ | २०.६ |
| रू. ५०,००१ - रू. १,००,००० | १३६ | १९.९ |
| रू. १,००,००१ - रू. २,००,००० | १०६ | १५.५ |
| रू. २,००,००१ - रू. ३,००,००० | ५५ | ८.१ |
| रू. ३,००,००० पेक्षा जास्त | २१ | ३.१ |
| **एकूण** | **६८३** | **१००.०** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| १२१.५९२ | ६ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्नानुसार (रू.) वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील २०.६% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रु. रू. २५,००१ - रू. ५०,००० दरम्यान असून १९.९% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रू. ५०,००१ - रू. १,००,००० दरम्यान आहे. तसेच

१८.३% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न नसून १५.५% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रू. १,००,००१ - रू. २,००,००० दरम्यान आहे. त्याचप्रमाणे १४.५% व ८.१% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रू. २५,००० पेक्षा कमी व रू. २,००,००१ - रू. ३,००,००० दरम्यान असून ३.१% शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रू. ३,००,००० पेक्षा जास्त आहे.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतकऱ्यांची वार्षिक बिगर-कृषी उत्पन्नानुसार (रू.) तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = १२१.५९२; स्वातंत्र्यांश =६; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रु. रू. २५,००१ - रू. ५०,००० दरम्यान आहे.

**सारणी क्रमांक ३ : यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक घरगुती खर्चानुसार (रू.) वर्गीकरण**

| वार्षिक घरगुती खर्च (रू.) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू.५०,००० पेक्षा कमी | ७१ | १०.४ |
| रू. ५०,००१ - रू. १,००,००० | १३८ | २०.२ |
| रू. १,००,००१ - रू. २,००,००० | १६७ | २४.५ |
| रू. २,००,००१ - रू. ३,००,००० | १५५ | २२.७ |
| रू. ३,००,००१ - रू. ५,००,००० | १०७ | १५.७ |
| रू. ५,००,००० पेक्षा जास्त | ४५ | ६.६ |
| **एकूण** | **६८३** | **१००.०** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| १०३ | ५ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वार्षिक घरगुती खर्चानुसार (रू.) वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील २४.५% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. १,००,००१ - रू. २,००,००० दरम्यान असून २२.७% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रु. २,००,००१ - रू. ३,००,००० दरम्यान आहे. तसेच २०.२% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. ५०,००१ - रू. १,००,००० दरम्यान असून १५.७% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. ३,००,००१ - रू. ५,००,००० दरम्यान आहे. त्याचप्रमाणे १०.४% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. ५०,००० पेक्षा कमी असून ६.६% शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. ५,००,००० पेक्षा जास्त आहे.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतकऱ्यांची वार्षिक घरगुती खर्चानुसार (रू.) तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = १०३; स्वातंत्र्यांश =५; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्च रू. १,००,००१ - रू. २,००,००० दरम्यान आहे.

## निष्कर्ष

यवतमाळ जिल्ह्यातील शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांकडे २ ते ४ हेक्टर शेती आहे. कोरडवाहू (बिगर सिंचित) स्वरूपाची शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक असूनबहुतांश शेतकऱ्यांकडे स्वत:च्या मालकीची जमीन आहे. शेतीतून मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,००,००१ - रु. २,००,००० दरम्यान असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. बहुतांश शेतकऱ्यांचे वार्षिक बिगर-कृषी उत्पन्न रु. रू. २५,००१ - रू. ५०,००० दरम्यान आहे. बहुतांश शेतकऱ्यांचा वार्षिक घरगुती खर्चरू. १,००,००१ - रू. २,००,००० दरम्यान आहे. रू. २५,००१ - रू. ५०,००० दरम्यान वार्षिक बचत करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी शेती कर्ज घेतले आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी व्यावसायिक बँकेकडून कर्ज घेतले असले तरी सहकारी बँक, बचत गट व सावकारा कडून देखील त्यांनी कर्ज घेतले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी गेल्या ३ वर्षात सरासरी रू. १,००,००१ - रू. २,००,००० दरम्यान कर्ज घेतले आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी पिक उत्पादनासाठी कर्ज घेतले आहे

तसेच उपकरण खरेदी, कृषि उद्योग गुंतवणूक व घरगुती खर्चासाठी देखील त्यांनी कर्ज घेतले आहेत. बहुतांश शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यात अडचणी येत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांकडे गायी/म्हशी व त्याखालोखाल पॉवर टिलर आहे. बहुतांश शेतकऱ्यांची सध्याची आर्थिक स्थिती चांगली आहे. बहुतांश शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गेल्या ५ वर्षात सुधारली आहे.

## संदर्भ:


1) National Bank for Agriculture and Rural Development. (2019). Yavatmal PLP 2019–20. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1710180954Yavatmal%20PLP%202019-20.pdf
2) National Bank for Agriculture and Rural Development. (2020). PLP 2020–21: Yavatmal District. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/2910195259YAVATMAL%20PLP-2020-21%20-%20Last.pdf
3) Department of Animal Husbandry & Dairying, Government of India. (2024). Annual Report 2023–24. https://dahd.gov.in/sites/default/files/2024-10/AnnualReport202324.pdf
4) National Institution for Transforming India (NITI Aayog). (2021). Agriculture, Animal Husbandry and Fisheries Sector Report. https://dmeo.gov.in/sites/default/files/2021-07/1_Sector_Report_Agriculture_Animal_Husbandry_and_Fisheries_FINAL.pdf
5) Directorate of Economics and Statistics. (2024). Economic Survey of Maharashtra 2023–24. https://mahades.maharashtra.gov.in/ESM1920/chapter/English/esm2324_e.pdf
6) Press Information Bureau, Government of India. (2025, January 31). India's agriculture sector demonstrates resilience, average growth rate of 5% during FY17 to FY23: Economic Survey. https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2097886
7) Sujatha, R. N. (2019). Nature and scope of allied activities in agriculture. International Journal of Research and Analytical Reviews, 6(1), 273–276. https://ijrar.org/papers/IJRAR19J5699.pdf
8) OpenEdition Books. (2002). The national legacy in India: Evolution of agricultural policy since the sixties. In D. Mazumdar (Ed.), Evolution of Agricultural Policy since the Sixties (pp. 21–43). https://books.openedition.org/editionsmsh/7542?lang=en